## प्रेसनोट

# " महाराष्ट्र सेवानिवृत्ती पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचा मेळावा व सत्कार"

जा.क्र. १७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०१/२०१८

भंडारा– दिनांक ०७/०१/२०१८ रोजी पोलीस बहुउददेशीय सभागृह भंडारा येथे महाराष्ट्र सेवानिवृत्ती पोलीस अधीकारी/ कर्मचारी कल्याणकारी असोशिएशन नागपुर शाखा भंडाराचे वतीने सेवानिवृत्त अधीकारी/कर्मचारी यांचा मेळावा व सत्कार समारोह कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. विनिता साहू पोलिस अधिक्षक भंडारा हे होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित मा. रमेश मेहता अध्यक्ष सेवानिवृत्ती पोलीस अधीकारी असोशिएशन नागपुर हे होते. कार्यक्रमामध्ये ७५ वर्षे झालेल्या निवृत्त अधीकारी कर्मचारी यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवुन सन्मान करण्यात आले. सन २०१७ मध्ये सेवानिवृत्त अधीकारी/ कर्मचारी यांचा सुध्दा मा. पाहुण्याचे हस्ते शाल/श्रीफळ व पुष्पगुच्छ देवुन सन्मान करण्यात आला. तसेच राजकिय व सामाजीक क्षेत्रात कार्य करणारे पोलीस कुंटुबियांचे न.प. ग्रामपंचायत पदाधीकारी यांचा सुध्दा सत्कार करण्यात आला.

संघटनेच्या वतीने सेवानिवृत्त अधीकारी, कर्मचारी यांना त्यांच्या आरोग्याबद्दल संघटनेचे अध्यक्ष मा. मेहता यांनी एक्स्पर्ड डॉक्टरांचा सल्ला घेवुन त्यांना कमीत कमी खर्चात उपाय योजना करण्याबाबत मार्गदर्शन केले. मा. विनीता साहू पोलीस अधीक्षक भंडारा यांनी सर्व सभासंदाचे आभार मानले आणी मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला ४०० अधीकारी/ कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे यशस्वीते करीता संघटनेचे भंडारा जिल्हा अध्यक्ष शालीकराम झंझाड,मार्गदर्शक, श्री निखाडे सचिव श्री. नवखरे, उपाअध्यक्ष श्री. भोवते, कोषाध्यक्ष धनराज कोचे, महिला प्रतिनिधी सौ. प्रमिला तिरपुडे, सेवककुमार लांजेवार, माकडे ,भमराव उंदिरवाडे, हरिभाऊ ईश्वरकर, नंदकिशोर माहुर्ले यांनी यांचे अथक प्रयत्न केले.

कार्यक्रमाचे संचालन अरविंद हलमारे यांनी केले.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.